फळबाग

# जांभूळ लागवड ठरते लाभदायक



**दर्शना मोरे**
सहायक प्राध्यापक
(मो.नं.९६८९२१७७९०)
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक



जांभूळ तसे कोरडवाहू फळपीक आहे. कमी पाणी असणाऱ्या ठिकाणी तसेच कमी प्रतीच्या मातीमध्ये सुद्धा या फळाचे उत्पादन घेतले जाऊ शकते. डोंगरावर, जंगलात तसेच शेताच्या बांधावर वारा प्रतिरोधक म्हणून ही झाडे लावतात. जांभळाच्या फळामध्ये लोह, खनिजे, शर्करा आणि इतर अन्नद्रव्ये भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. जांभळाच्या फळांपासून रस, सरबत, जेली, व्हिनेगार, मद्य तयार करतात. त्याचा रस थंड आणि पाचक असतो.

**जां**भळाची लागवड प्रामुख्याने उष्ण आणि समशीतोष्ण हवामानात केली जाते. कोकणामधील उष्ण आणि दमट हवामान, भरपूर पाऊस तसेच दुष्काळी भागातील अत्यंत कमी पाऊस आणि कोरडे हवामान देखील जांभळाच्या झाडास मानवते. परंतु फुले येण्याच्या आणि फळधारणेच्या काळात कोरडे हवामान आवश्यक असते.

जांभूळ झाडाच्या वाढीसाठी ठराविक प्रकारच्या जमिनीची आवश्यकता नसते. माळरानावरील पण हलकी परंतु थोडी खोली असलेली जमीन, पोयट्याची जमीन, ओढे आणि नदीकाठाची गाळाची जमीन आणि कोकणातील जांभळ्या खडकाची तांबडी जमीन अशा विविध प्रकारच्या जमिनीमध्ये जांभळाची झाडे चांगल्या प्रकारे वाढतात.

**सुधारित जाती :** जांभळाच्या जातींमध्ये अनेक प्रकार आढळतात. त्यामध्ये लिंबाच्या आकारापासून तर बोराच्या आकारापर्यंत जांभळाच्या फळांचा आकार असतो. लहान आकाराच्या फळांची चव तुरट असते तर मोठी फळे चवीला गोड असतात. लहान आकाराची बी असणाऱ्या जांभळाला 'लेंडी जांभूळ' म्हणतात. लागवड करण्यासाठी मोठी किंवा मध्यम आकार परंतु भरपूर गोड गर आणि लहान बी असलेली फळे येणाऱ्या झाडांच्या फळांतील बियांचा उपयोग करावा. जांभळाचे प्रामुख्याने दोन प्रकार आढळतात.



१) **रा जामून :** या जातीची फळे आकाराने लांबट मोठी आणि गर्द जांभळ्या रंगाची असतात. फळातील गर फिकट गुलाबी रंगाचा गोड आणि रसदार असतो. फळातील बी लहान असते. या जातीची फळे जून- जुलै महिन्यात तयार होतात.

२) **कठ जामून :** या जातीची फळे आकाराने लहान आणि गोल असतात. पक्व फळांचा रंग गर्द जांभळा ते काळसर असतो. फळातील गर जांभळ्या रंगाचा असून, कमी रसदार आणि चवीला तुरट असतो. फळातील बी मोठ्या आकाराची असते. या जातीची फळे ऑगस्ट महिन्यात तयार होतात. त्याचप्रमाणे कोकण बहाडोली या जातीची फळे मोठी (२३.४ ग्रॅम वजन) असतात. फळांचा रंग गर्द जांभळा असून फळे चार दिवस चांगली टिकतात. फळांचे उत्पादनही चांगले मिळते.

**अभिवृद्धी आणि लागवड पद्धती**

जांभळाची अभिवृद्धी बियांपासून अथवा भेट कलम किंवा डोळे भरून करता येते. परंतु बियांपासून तयार केलेल्या झाडांमध्ये एकसारखेपणा दिसून येत नाही आणि अशा झाडांना फळे लागण्यास अधिक काळ लागतो. जांभळाच्या एका बीपासून ३-४ रोपे तयार होतात. त्यापैकी प्रत्येक बीमध्ये एक रोप अतिशय कमजोर व इतर रोपे जोमदारपणे वाढतात. दोनपेक्षा जास्त रोपे देणाऱ्या बियांपासून जोमदार वाढणाऱ्या रोपांचा लागवडीसाठी वापर केल्यास मातृवृक्षातील गुणधर्म नवीन झाडामध्ये दिसतात आणि यातील प्रत्येक रोपाला स्वतंत्र मुळे येतात. यासाठी बियांपासून सुमारे ५-६ महिने रोपे वाढू द्यावीत. अशी रोपे तयार करण्यासाठी ७.५ सेंटीमीटर रुंद आणि १५ सेंटीमीटर लांबीच्या पिशवीत जांभळाचे बी लावावे. ५-६ महिन्यांत या रोपांची वाढ १०-१५ सेंटीमीटर उंच होते. प्रत्येक पिशवीतील अतिशय कमजोर रोप काढून टाकावे आणि राहिलेल्या जोमदार रोपांपैकी प्रत्येक रोप काळजीपूर्वक मुळासह वेगळे करून ते पुन्हा स्वतंत्रपणे १५ सेंटीमीटर रुंद आणि २० सेंटीमीटर लांबीच्या पिशवीत लावावे आणि सुमारे ६ महिने वाढू द्यावे. ही पद्धत लागवडीसाठी सोपी आणि कमी खर्चाची असून कमी वेळात जास्त रोपे तयार करुन देणारी आहे.

**झाडे लावण्यापूर्वीची मशागत :** जांभळाच्या लागवडीसाठी खड्डे घ्यावेत. खड्ड्यांमध्ये २-३ घमेली शेणखत अधिक १ किलो सुपरफॉस्फेट यांच्या मिश्रणाने भरून घ्यावेत. प्रत्येक खड्ड्यात २५० ग्रॅम लिंडेन पावडर १०% मातीत चांगली मिसळावी. पावसाच्या सुरूवातीला प्रत्येक खड्ड्यात जांभळाचे एक रोप लावावे.

**हंगाम आणि लागवडीचे अंतर :** जांभळाच्या झाडाची स्वतंत्रपणे लागवड करत असताना दोन झाडांमधील आणि दोन ओळींमधील अंतर १० मीटर ठेवावे. रोपांची लागवड पावसाळ्याच्या सुरूवातीला करावी.

**वळण आणि छाटणी :** झाडांना नियमितपणे वळण देण्याची अथवा छाटणी करण्याची आवश्यकता नसते. सुरुवातीच्या काळात रोप वाढत असताना जमिनीपासून सुमारे ७५ ते १०० सेंटीमीटर उंचीपर्यंत फुटलेल्या फांद्या

तसेच फुटवे काढून टाकावेत. दरवर्षी फळांचा हंगाम संपल्यानतर वाळलेल्या, रोगट फांद्या छाटाव्यात.

**खते आणि पाणी व्यवस्थापन** : जांभळाच्या झाडाला खते दिली जात नाहीत. परंतु पहिल्या वर्षाच्या सुरूवातीला प्रत्येक झाडाला २-३ घमेली शेणखत आणि ५०-६० ग्रॅम सुफला आळे पद्धतीने मातीत मिसळून द्यावा. शक्य असल्यास पहिल्या वर्षी पावसाळ्यानंतर वर्षभर पाणी द्यावे. त्यामुळे झाडाची वाढ जोमाने होते. दुसऱ्या वर्षी सर्वसाधारणपणे प्रत्येक रोपाला ५०-१०० ग्रॅम मिश्रखत जून- जुलै महिन्यामध्ये आणि ५०-१०० ग्रॅम युरिया ऑगस्ट महिन्यात द्यावा. तिसऱ्या आणि चौथ्या वर्षी झाडाच्या वाढीनुसार जून- जुलै महिन्यामध्ये शेणखताबरोबर २००-२५० ग्रॅम शेणखत द्यावे आणि ऑगस्ट- सप्टेंबरमध्ये २००-२५० ग्रॅम युरिया द्यावा. ज्या ठिकाणी पाणी कमी आहे अशा ठिकाणी खतांचे प्रमाण कमी ठेवावे.

**आंतरपिके, आंतरमशागत** : जांभळाची लागवड प्रामुख्याने हलक्या, खडकाळ आणि डोंगर उताराच्या जमिनीत केली जात असल्यामुळे सुरुवातीची तीन ते चार वर्षे तूर, चवळी, भुईमूग, सोयाबीन, हरभरा यासारखी पिके खरीप हंगामात आंतरपिके म्हणून घेतल्यास जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. जांभळाच्या बागेत पानकोबी, फुलकोबी, मुळा, वांगी, गाजर इत्यादी भाजीपाला पिके आंतरपिके म्हणून घेता येतात. तसेच पेरु, कागदी लिंबू ही फळझाडे पूरक झाडे (फिलर ट्री) म्हणून लावता येतात.

**महत्त्वाच्या किडी आणि त्यांचे नियंत्रण** : जांभळाचे झाड रोग आणि किडींना प्रतिकारक असून या फळझाडावर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव अतिशय कमी प्रमाणात होतो.

**फळमाशी** : या किडीची अळी फळातील गर खाते. त्यामुळे फळे गळतात व फळांची प्रत कमी होते.

**उपाय** : झाडाखाली पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत. फळे लहान असताना १० लिटर पाण्यात १० मिलिलिटर मेलॅथिऑन (५०% प्रवाही) या प्रमाणात मिसळून फवारावे. अथवा २० मिलिलिटर मेलॅथिऑन (५०% प्रवाही) आणि २०० ग्रॅम गूळ किंवा ऊसाची मळी २० लिटर पाण्यात मिसळून हे मिश्रण झाडावर फवारावे. उन्हाळ्यात सतत वखरणी आणि कुळवणी करावी. त्यामुळे फळमाशीचे मातीतील सुप्तावस्थेतील कोश नष्ट होतात.

**पाने खाणारी अळी** : जांभळाच्या रोपांवर तसेच मोठ्या झाडांवर या किडीचा प्रादुर्भाव आढळतो. अळी कोवळी पाने पानाच्या मध्यरेषेत कुरतडून खाते. त्यामुळे पानाच्या शिराच शिल्लक राहतात.

उपाय : या किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १० मिलिलिटर रोगोर या प्रमाणात मिसळून फवारावे.

**महत्त्वाचे रोग आणि त्यांचे नियंत्रण**

पानावरील ठिपके आणि फळकूज : हा रोग ग्लोमेरेला सिंग्युलटा या बुरशीमुळे होतो. बुरशीचा प्रादुर्भाव झालेल्या झाडांच्या पानांवर लालसर तपकिरी रंगाचे ठिपके पडतात. फळावर बुरशीचा प्रादुर्भाव झाल्यास फळावर सुरकुत्या पडतात आणि फळे कुजतात.

उपाय : या रोगाच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ३ ग्रॅम डायथेन झेड ७८ हे बुरशीनाशक मिसळून फवारावे.

**फळांची काढणी, उत्पादन आणि हाताळणी** : बियांपासून अभिवृद्धी केलेल्या जांभळाच्या झाडाला लागवडीनंतर ८ वर्षांनी फळे येतात. सर्वसाधारणपणे जानेवारी – फेब्रुवारी महिन्यात जांभळाच्या झाडाला फुले येतात आणि एप्रिल ते जूनमध्ये फळे काढणीस येतात. फळे पिकल्यानंतर, पूर्णपणे काळसर झाल्यावर फळांची काढणी करावी. जांभळाचे फळ फार नाजूक आणि नाशवंत असल्यामुळे फळांची काढणी अतिशय काळजीपूर्वक करावी लागते. फळे तोडणीला उशीर झाल्यास ती जास्त पिकून झाडाखाली गळून पडतात. पक्व तसेच अति पिकलेली फळे बेचव लागतात. जांभळाच्या एका झाडापासून सुमारे १०० किलोपर्यंत फळे मिळतात. फळे झाडावरून काढल्यानंतर २-३ दिवसांपर्यंत चांगली राहतात. त्यानंतर मात्र सडतात. जांभळाच्या झाडाचे उत्पादनक्षम आयुष्य ६० वर्षे असते.

दरवर्षी पावसाळ्याच्या सुरवातीला एक घमेले शेणखत द्यावे. पूर्ण वाढ झालेल्या पाच वर्षांच्या झाडास पाच घमेली चांगले कुजलेले शेणखत, एक किलो युरिया, १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट, ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश आळ्यात मिसळून द्यावे. कलमांची भटक्या जनावरांपासून काळजी घ्यावी. लागवडीपासून सातव्या वर्षी उत्पादन सुरू होते.

जांभळे किंवा जांभळापासून बनवलेले पदार्थ नियमित खाल्ल्यामुळे यकृत निरोगी राहते व मूत्राशयाचे आजार होत नाहीत. खास करून मधुमेह या आजारावर उपाय म्हणून या फळाच्या बियांचे चूर्ण देतात. याच्या नियमित सेवनाने केस लांबसडक व मजबूत होतात. या झाडाच्या फांद्यांवर टसर नावाचे रेशीमकिडे पाळतात.

■